दि.कि.अर्ज क्रमांक १५/२०२६
तन्मय वि. कोणी नाही

## <u>निशाणी क्रमांक १ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ व ३ यांचे वडील मयत नामे **रविंद्र ज्ञानदेव जाधव** हे महाराष्ट्र राज्य पोलीस खात्यात हेड कॉन्स्टेबल या पदावर नोकरीस कायस्वरुपी होते. त्यांचा पोलीस खात्यामध्ये एकूण नोकरीचा कालावधी २५ वर्षे इतर होता. सदर अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील नामे रविंद्र ज्ञानदेव जाधव हे दि. ०५/०६/२०२० रोजी ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने मौजे माढा, ता. माढा येथे मयत झाले आहेत व त्याबाबतची मृत्यूची नोंद नगरपंचायत माढा येथे घेतली आहे. त्यामुळे, अर्जदारांनी सदरचा अर्ज शासकीय कामासाठी सदर मयत नामे रविंद्र ज्ञानदेव जाधव यांचे वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी दाखल केला आहे. अर्जदारांनी सदर मयतास अर्जदार यांचेव्यतिरिक्त कोणीही वारस नाहीत असे कथन करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३) प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस दिनांक ०१/०४/२०२६ रोजी दैनिक 'तरुण भारत' नि.क्र. १२ वर देण्यात आली. जाहीर प्रगटनासह बेलीफ अहवाल निशाणी क्र. **६** वर दाखल केलेला आहे. अर्जदारांच्या ओळखीबाबत अर्जदारांनी आधारकार्डाची छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. तसेच अर्जदार यांच्या मागणीच्या पुष्टयर्थ अर्जदार क्र. १ यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ८ वर दाखल केले आहे व सदर शपथपत्रामध्ये त्यांनी अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. अर्जदार यांनी मयत **रविंद्र ज्ञानदेव जाधव** यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत नि.क्र. ११ वर दाखल केली आहे. तसेच, मयताची पत्नी, आईवडील यांचे मृत्यू प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत.

४) अर्जदार यांनी दाखल केलेल्या मृत्यू दाखल्याची पाहणी करता मयत **रविंद्र ज्ञानदेव जाधव** यांचा मृत्यू दिनांक ०५/०६/२०२० रोजी झाल्याचे दिसते. अर्जास विहीत कालावधीमध्ये तसेच आजपर्यंत अर्जदारांच्या अर्जातील मागणीस कोणाचीही हरकत अथवा आक्षेप दाखल झालेला नाही. करिता, अर्जदारांचा पुरावा विनाआव्हानात्मक राहिलेला

आहे. त्यामुळे पुराव्याचे शपथपत्र व दाखल कागदपत्रांवरुन उपरोक्त अर्जदार क्र. १ व ३ मयताची मुले, अर्जदार क्र. २ ही सदर मयताची मुलगी या नात्याने अर्जदार क्र. १ ते ३ हे सदर मयताचे वारस असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ३ यांना मयत **रविंद्र ज्ञानदेव जाधव** यांचे पश्चात सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस असल्याबाबत वारस–प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट,१८२७ चे परिशिष्ट–ब प्रमाणे आवश्यक मुद्रांक दिल्यानंतर देण्यात यावे.

ANAY DNYANESH KULKARNI

Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.08.05 17:34:45 +0530

दिनांक – ०५/०८/२०२६

**(अनय ज्ञा. कुलकर्णी)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

माढा.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 2$^{nd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 05/08/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 05/08/2026 |